# प्रेसनोट

दि.२८/१२/२०२१

## घोडेगांव पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथील सहायक पोलीस उपनिरीक्षकावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | घोडेगांव पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३४ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - कोंडाजी दामोदर रेंगडे, वय - ५३ वर्षे,<br>पद - सहायक पोलीस उप निरीक्षक **(ASI).**<br>नेमणुक - घोडेगांव पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- ( पांच हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २,०००/- ( दोन हजार रूपये) |

पडताळणी व सापळा दिनांक :- २८/१२/२०२१.
ठिकाण :- घोडेगांव पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांच्या विरूध्द गुन्हा दाखल असून सदर गुन्हयाची सुनावणी घोडेगांव कोर्टामध्ये सुरू आहे. सदर सुनावणीच्या वेळी तक्रारदार न्यायालयात हजर राहत नसल्याने मा. न्यायालयाने तक्रारदार यांच्याविरूध्द वॉरंट काढले सदरचे वॉरंट रद्द करून घेण्यासाठी लोकसेवकाने ५,०००/- रूपये लाचेची मागणी केली. तशी तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची दिनांक २८/१२/२०२१ रोजी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक यानी तक्रारदार यांच्याविरूध्द मा. न्यायालयाने काढलेले वॉरंट रद्द करून घेण्यासाठी तक्रारदाराकडे लाचेची मागणी करून तडजोडीअंती २,०००/- रूपये लाच रक्कम स्वीकारल्यावर ताब्यात घेण्यात आले असून घोडेगांव पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस उप अधीक्षक शीतल घोगरे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.